निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
सोमवार
०२ फेब्रुवारी २०२६
पाने: ०४ किंमत: २ .००
वर्ष: १५ वे अंक: ३३७ वा

RNI.No.MAH/MAR2011/39247

E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. G 2/RNP/AGD-441/2024-26 | मुख्य संपादक- सुग्रीव मुंढे

## महाराष्ट्राचा डंका!

# केंद्रीय अर्थसंकल्पातून राज्याच्या झोळीत १ लाख कोटी; फडणवीसांनी मांडला 'विकसित महाराष्ट्राचा' रोडमॅप

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी/** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने आज सादर केलेल्या अर्थसंकल्पात महाराष्ट्रावर निधीचा वर्षाव केला आहे. हा अर्थसंकल्प म्हणजे 'विकसित भारता'च्या दिशेने टाकलेले एक दमदार पाऊल आहे, अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या निर्णयाचे स्वागत केले. केंद्रीय करांमधील हिस्सा आणि विविध प्रकल्पांसाठीचा निधी मिळून महाराष्ट्राला तब्बल १ लाख कोटी रुपयांचा लाभ होणार असून, यामुळे राज्याच्या विकासाला रॉकेट गती मिळणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

**आकडेवारीचा धमाका: महाराष्ट्राला काय मिळाले?**

मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या माहितीनुसार, केंद्रीय करांतील राज्याचा वाटा ९८,३०६ कोटी रुपये इतका राहणार आहे. या व्यतिरिक्त, प्राथमिक आकलनानुसार विविध पायाभूत प्रकल्पांसाठी १२,३५५ कोटी रुपये स्वतंत्रपणे मिळणार आहेत. विशेष म्हणजे, पूर्वी पायाभूत सुविधांसाठी केवळ १ लाख कोटींची तरतूद असायची, ती आता १२ लाख कोटींवर नेण्यात आली असून, याचा सर्वाधिक फायदा उद्योग आणि गुंतवणुकीचे केंद्र असलेल्या महाराष्ट्राला होणार आहे.

**पायाभूत सुविधांचे जाळे: हायस्पीड कॉरिडॉर ते मेट्रो**

राज्यातील वाहतूक व्यवस्था आणि दळणवळण सुलभ करण्यासाठी केंद्र सरकारने मोठी तिजोरी उघडली आहे:

बुलेट ट्रेन (मुंबई-अहमदाबाद): ६,१०३ कोटी रुपये.,मेट्रो प्रकल्प: मुंबई मेट्रोसाठी १,७०२ कोटी तर पुणे मेट्रोसाठी ५१७.७४ कोटी., हायस्पीड **कॉरिडॉर:** मुंबई-पुणे आणि पुणे-हैदराबाद कॉरिडॉरमुळे महाराष्ट्राच्या जीडीपीत मोठी भर पडणार आहे. विशेषतः मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्राच्या विकासाचे नवे द्वार उघडले जाणार आहे.

समृद्धी महामार्ग: आयटीएस (ITS) प्रणालीसाठी ६८०.७९ कोटींची तरतूद.

**'ग्रोथ हब' आणि शहरी नियोजनावर भर**

मुंबई महानगर (MMR), पुणे आणि नागपूर या शहरांना जागतिक दर्जाचे 'ग्रोथ हब'बनवण्यासाठी प्रत्येकी ५,००० कोटी रुपये पुढील पाच वर्षांत प्राप्त होणार आहेत. ५ लाख लोकसंख्या असलेल्या शहरांच्या एकात्मिक विकासावर भर देऊन सरकारने शहरीकरणाला शिस्त लावण्याचा विडा उचलला आहे.

**महिला, आरोग्य आणि कृषी क्षेत्रासाठी 'बूस्टर डोस'**

लखपती दीदी आणि महिला सक्षमीकरण: महिलांसाठी स्वतंत्र मॉल्स आणि उद्योजकता संधींची निर्मिती केली जाणार आहे. प्रत्येक जिल्ह्यात उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींसाठी सरकारी वसतिगृहे उभारली जातील.

**आरोग्य:** जिल्हा रुग्णालयांमध्ये 'आपात चिकित्सा' (Emergency Care) व्यवस्था उभी करण्याचा क्रांतिकारी निर्णय घेण्यात आला आहे.शेती: शेती, पशुपालन आणि सिंचनासाठी भरीव तरतूद असून, उपसा सिंचन योजनांच्या सौर ऊर्जीकरणासाठी २०७ कोटी रुपये देण्यात आले आहेत.

**प्रमुख प्रकल्पांची आकडेवारी**




**एका नजरेत:**

प्रकल्प निधी (कोटीमध्ये)

महाराष्ट्र ग्रामीण रस्ते प्रकल्प - ३७८.३८ ,शेती आणि ग्रामीण परिवर्तन - ६४६.२४, वैद्यकीय शिक्षण विकास - ३८५.७८ ,कौशल्य विकास - ३१३.६५ ,MMR ग्रीन मोबिलिटी - १५५.३२ पूर्वीच्या सरकारच्या काळात जो निधी मिळायचा, त्यापेक्षा कैक पटीने अधिक निधी मोदी सरकारने महाराष्ट्राला दिला आहे.हा अर्थसंकल्प केवळ आकड्यांचा खेळ नाही,तर महाराष्ट्रातील प्रत्येक सामान्य माणसाचे जीवन बदलणारा जाहीरनामा आहे, अशा कडक शब्दांत मुख्यमंत्री फडणवीस यांनी विरोधकांना चपराक लगावली आहे.

## संक्षिप्त

### स्व. अजितदादा पवार यांच्या अस्थिकलशाचे उद्या छत्रपती संभाजीनगरमध्ये आगमन

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी/**महाराष्ट्राच्या राजकारणातील एक उत्तुंग व्यक्तिमत्व आणि राज्याचे उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या अस्थिकलशाचे उद्या, सोमवार, दि. २ फेब्रुवारी २०२६ रोजी छत्रपती संभाजीनगर शहरात आगमन होणार आहे. लाडक्या नेत्याचे अंत्यदर्शन घेता यावे, यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने विशेष नियोजन करण्यात आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, उद्या सकाळी ११ ते दुपारी १ या वेळेत शहरातील देवगिरी महाविद्यालय परिसर येथे हा अस्थिकलश दर्शनासाठी ठेवण्यात येणार आहे. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि सामान्य नागरिकांना आपल्या लाडक्या नेत्याच्या अस्थिकलशाचे दर्शन घेऊन श्रद्धांजली अर्पण करता येईल.शहरातील दर्शन सोहळ्यानंतर दुपारी २ वाजता हा अस्थिकलश गंगापूर तालुक्यातील कायगाव टोका येथील प्रवरा आणि गोदावरी नदीच्या पवित्र संगमावर नेण्यात येईल. तेथे विधीवत पूजन करून अस्थींचे विसर्जन करण्यात येणार आहे.

**राष्ट्रवादी परिवारातर्फे आवाहन**

या दुखद प्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष आ. सतीश चव्हाण आणि शहराध्यक्ष अभिजित देशमुख यांनी सर्व कार्यकर्त्यांना आणि नागरिकांना दर्शनासाठी उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे. या कार्यक्रमाच्या नियोजनासाठी संपूर्ण राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी परिवार प्रयत्नशील आहे.

**अस्थिकलश दर्शन:** सकाळी ११:०० ते ०१:०० (देवगिरी महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर),**अस्थि विसर्जन:** दुपारी ०२:०० वाजता (गोदावरी नदी, कायगाव टोका, ता. गंगापूर)

### देवगिरी साखर कारखान्यात दुरुस्ती दरम्यान अपघात; बिहारच्या कामगाराचा मृत्यू

**आत्ताच एक्सप्रेस**

**फुलंब्री (प्रतिनिधी)** येथील देवगिरी सहकारी साखर कारखान्यात दुरुस्तीचे काम करत असताना उंचावरून पडून एका कामगाराचा मृत्यू झाला आहे. आझाद गद्दी छबीला गद्दी (वय ४७) असे मृताचे नाव असून, ते मूळचे बिहार राज्यातील गोपालगंज जिल्ह्यातील रहिवासी होते.

**नेमकी घटना काय?**

मिळालेल्या माहितीनुसार, देवगिरी सहकारी साखर कारखान्यात सध्या यंत्रसामग्रीच्या देखभालीचे आणि दुरुस्तीचे काम वेगाने सुरू आहे. आझाद गद्दी हे अन्य सहकाऱ्यांसोबत या दुरुस्ती कामात गुंतले होते. कामावर असताना अचानक त्यांचा तोल गेला आणि ते उंचावरून खाली कोसळले. या भीषण अपघातात त्यांच्या डोक्याला आणि शरीराच्या अन्य भागांना गंभीर दुखापत झाली.

**उपचारादरम्यान प्राणज्योत मालवली**

अपघात घडल्यानंतर कारखाना प्रशासनाने आणि इतर कर्मचाऱ्यांनी तातडीने त्यांना उपचारासाठी औरंगाबाद येथील मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये हलवले. डॉक्टरांनी त्यांच्यावर उपचार करण्याचा आटोकाट प्रयत्न केला, मात्र जखमा गंभीर असल्याने उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.या घटनेनंतर फुलंब्री पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची (AD) नोंद करण्यात आली आहे. घटनेचा अधिक तपास पोलीस करत असून, सुरक्षेच्या उपाययोजनांबाबत काही त्रुटी होत्या का, याचाही शोध घेतला जाण्याची शक्यता आहे. एका गरीब कष्टकरी कामगाराचा अशा प्रकारे कामावर असताना मृत्यू झाल्याने कामगार वर्गात शोककळा पसरली आहे

# विकसित भारताचा महामार्ग: मोदींच्या भाषणातील 'युवाशक्ती' अर्थसंकल्पाचे ७ हुकमी एक्के!



**आत्ताच एक्सप्रेस**

**नवी दिल्ली/प्रतिनिधी/** अर्थमंत्री निर्मला सीतारामण यांनी सादर केलेला अर्थसंकल्प म्हणजे केवळ आकड्यांचा खेळ नसून, तो १४० कोटी भारतीयांच्या स्वप्नांना पंख देणारा 'अफाट संधींचा महामार्ग' आहे, अशा शब्दांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या बजेटचे स्वागत केले. आम्ही केवळ वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था राहून समाधानी नाही, तर देशाला जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनवण्यासाठी हे बजेट इंधन ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

पंतप्रधानांच्या भाषणातील ७ प्रमुख वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत:

**१. युवाशक्तीला 'मुक्त आकाश' आणि संधींचा महामार्ग**

**हा** अर्थसंकल्प प्रामुख्याने तरुणांवर केंद्रित आहे. मोदींच्या मते, भारतातील प्रतिभावान तरुणांना त्यांच्या आवडीच्या क्षेत्रात अभिव्यक्ती मिळावी यासाठी हे 'मुक्त आकाश' आहे. ऑरेंज इकॉनॉमी (क्रिएटर इकॉनॉमी), पर्यटन आणि 'खेलो इंडिया'च्या माध्यमातून तरुणांसाठी रोजगाराचे लाखो नवीन दरवाजे उघडले जाणार आहेत.

**२. तिसऱ्या मोठ्या अर्थव्यवस्थेकडे झेप**

आम्हाला थांबायचे नाही, तर धावायचे आहे! असे म्हणत मोदींनी स्पष्ट केले की, हे बजेट भारताला जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनवण्याच्या प्रवासातील महत्त्वाचा टप्पा आहे. यात वित्तीय तूट कमी करण्यासोबतच उच्च वाढीचा (High Growth) मेळ घालण्यात आला आहे.

**३. 'कौशल्य, प्रमाण आणि शाश्वतता'**

पंतप्रधानांनी '3S' चा मंत्र दिला आहे. नागरिकांच्या कौशल्यावर भर देणे, उत्पादनाचे प्रमाण वाढवणे आणि ते शाश्वत ठेवणे हा या अर्थसंकल्पाचा मूळ आत्मा आहे. नागरिकांमध्ये केलेली गुंतवणूक हीच देशाची सर्वात मोठी संपत्ती असल्याचे त्यांनी नमूद केले.

> **पंतप्रधानांचा मुख्य संदेश**
>
> हा अर्थसंकल्प रिफॉर्म (सुधारणा), परफॉर्म (कामगिरी) आणि ट्रान्सफॉर्म (परिवर्तन) या सूत्राला नवीन गती देणारा आहे. हे बजेट मध्यमवर्गीयांना बळ देणारे आणि गरिबांना गरिबीतून बाहेर काढणारे ठरेल.

**४. पायाभूत सुविधांचा वेग: हाय-स्पीड रेल्वे आणि स्मार्ट शहरे**

देशाचा कायापालट करण्यासाठी हाय-स्पीड रेल्वे कॉरिडॉर आणि टियर २, टियर ३ शहरांच्या विकासावर प्रचंड भर देण्यात आला आहे.

यामुळे केवळ दळणवळण सुधारेल असे नाही, तर छोट्या शहरांमध्येही विकासाची गंगा पोहोचेल.

**५. महिला शक्तीचा सन्मान: 'घरोघरी लक्ष्मी' पोहचवणार**

देशातील १० कोटींहून अधिक महिला स्वयं-सहायता गटांशी जोडल्या गेल्या आहेत. या महिलांच्या नेतृत्वाखालील विकासासाठी विशेष तरतूद केली आहे. प्रत्येक जिल्ह्यात मुलींसाठी वसतिगृहे बांधून त्यांच्या शिक्षणाची आणि रोजगाराची सोय केली जाणार आहे.

**६. तंत्रज्ञान आणि भविष्यातील उद्योग**

भारताला 'ग्लोबल डेटा सेंटर हब' बनवण्यासाठी कर सवलती जाहीर करण्यात आल्या आहेत. याशिवाय, दुर्मिळ खनिजे आणि हाय-टेक उपकरणांच्या निर्मितीवर भर देऊन भारताला भविष्यातील गरजांसाठी सज्ज करण्यात आले आहे.

**७. अन्नदात्याला आधुनिकतेची जोड: 'भारत विस्तार'**

शेतकऱ्यांसाठी दुग्धव्यवसाय, नारळ, काजू आणि कोको उत्पादनावर विशेष लक्ष केंद्रित केले आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, 'भारत विस्तार' या पद्वारे शेतकऱ्यांना आता त्यांच्या स्वतःच्या भाषेत तांत्रिक माहिती आणि हवामानाचे अपडेट्स मिळणार आहेत.

### शेती आणि 'कृषी एआय'ला मोठी उभारी; महाराष्ट्राच्या 'डिजिटल मॉडेल'ची देशात व्याप्ती

**आत्ताच एक्सप्रेस**

**नवी दिल्ली/प्रतिनिधी/** केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी सादर केलेला २०२६-२७ चा अर्थसंकल्प भारतीय कृषी क्षेत्रासाठी क्रांतीकारी ठरणार आहे. या अर्थसंकल्पात १.५ लाख कोटी रुपयांची विक्रमी तरतूद कृषी क्षेत्रासाठी करण्यात आली असून, यात तंत्रज्ञान (AI) आणि शाश्वत शेतीवर विशेष भर देण्यात आला आहे. महाराष्ट्राचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी या अर्थसंकल्पाचे स्वागत केले असून, अजितदादांचे कृषी-तंत्रज्ञानाचे स्वप्न आता देशपातळीवर साकार होत आहे, अशी भावना व्यक्त केली आहे.

१. 'इहरीरीं तळींरी': शेतकऱ्यांसाठी एआय-आधारित मदतीचा हात

महाराष्ट्राने यापूर्वीच 'महा-विस्तार' ॲप आणि ५५० कोटींच्या एआय धोरणाद्वारे देशात आघाडी घेतली होती. याच धर्तीवर केंद्र सरकारने 'इहरीरीं तळींरी' हे बहुभाषिक एआय साधन लाँच केले आहे.

फायदा: शेतकऱ्यांना त्यांच्या स्थानिक भाषेत हवामान अंदाज, पीक नियोजन आणि कीड नियंत्रणाची अचूक माहिती मिळेल.

डिजिटल शेती: यामुळे निर्णय घेण्याची प्रक्रिया वेगवान होऊन पिकांचे नुकसान कमी होईल.

२. फलोत्पादन आणि उच्च मूल्य पिकांवर भर

केवळ पारंपरिक पिकांवर



अवलंबून न राहता शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी उच्च मूल्य पिकांसाठी विशेष पॅकेज जाहीर करण्यात आले आहे:

**सविस्तर वृत्त पान ४ वर..**

# पशुसंवर्धन क्षेत्रात रोजगाराची नवी पहाट: केंद्रीय अर्थसंकल्पावर मंत्री पंकजा मुंडे

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/प्रतिनिधी/**केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी आज सादर केलेला २०२६ चा अर्थसंकल्प 'विकसित भारत' घडवण्याच्या दृष्टीने अत्यंत आश्वासक असून, यामुळे विशेषतः ग्रामीण भागात रोजगाराच्या संधींची मोठी लाट येईल, असा विश्वास महाराष्ट्र राज्याच्या पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी व्यक्त केला आहे.

या अर्थसंकल्पातील तरतुदींचे स्वागत करताना त्यांनी कृषी आणि पशुसंवर्धन क्षेत्रातील बदलांवर विशेष भर दिला.

अर्थसंकल्पातील महत्त्वाचे मुद्दे आणि पंकजा मुंडे यांचे विश्लेषण:

मंत्री पंकजा मुंडे यांनी या अर्थसंकल्पाचे वर्णन 'आत्मनिर्भर भारताला दिशा देणारा'असे केले असून, खालील प्रमुख क्षेत्रांवर त्यांनी प्रकाश टाकला:

उद्योजकतेची नवी संधी: पशुसंवर्धन क्षेत्रासाठी जाहीर केलेला 'कर्ज-संलग्न अनुदान कार्यक्रम' (Credit-Linked Subsidy Program) हा शेतकरी आणि सुशिक्षित बेरोजगार तरुणांसाठी वरदान ठरेल. यामुळे दुग्धव्यवसाय आणि कुक्कुटपालनावर आधारित एकात्मिक मूल्य साखळी निर्माण होऊन स्थानिकांना गावातच उद्योग सुरू करता येतील.

शिक्षण आणि पायाभूत सुविधा: देशात पशुवैद्यकीय व्यावसायिकांची कमतरता भरून काढण्यासाठी खाजगी क्षेत्रात नवीन पशुवैद्यकीय महाविद्यालये, रुग्णालये आणि निदान प्रयोगशाळा सुरू करण्याचा निर्णय क्रांतीकारक आहे. यामुळे आगामी काळात पशुवैद्यकीय व्यावसायिकांची संख्या २० हजारांहून अधिक वाढण्यास मदत होईल.

आधुनिक तंत्रज्ञान व संशोधन: भारतीय आणि विदेशी संस्थांमध्ये सहकार्य वाढवण्याच्या



निर्णयामुळे पशुसंवर्धन क्षेत्रात जागतिक दर्जाचे तंत्रज्ञान आणि संशोधन येईल. याचा थेट फायदा पशुपालकांना त्यांचे उत्पादन वाढवण्यासाठी होईल.

अर्थव्यवस्थेत पशुधनाचा वाटा: शेतीच्या एकूण उत्पन्नात पशुधनाचा वाटा १६ टक्के आहे. विशेषतः गरीब आणि अल्पभूधारक कुटुंबांसाठी हा उत्पन्नाचा मुख्य स्रोत आहे. प्रस्तावित भांडवली अनुदान योजना या कुटुंबांचे आर्थिक स्तर उंचावण्यास मदत करेल.

महाराष्ट्राची भूमिका: केंद्राशी समन्वय

पंकजा मुंडे यांनी स्पष्ट केले की, केंद्र सरकारने घेतलेल्या या निर्णयांचा आणि सवलतींचा फायदा तळागाळातील पशुपालक, दुग्ध उत्पादक आणि कुक्कुटपालकांपर्यंत पोहोचवण्यासाठी महाराष्ट्र शासन कटिबद्ध आहे. राज्य सरकार केंद्र सरकारशी समन्वय साधून या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक ती पावले उचलणार आहे.

हा अर्थसंकल्प केवळ आकड्यांचा खेळ नसून तो महिला, वंचित घटक आणि पायाभूत सुविधांना गती देणारा आहे. यामुळे भारताचे जागतिक अर्थव्यवस्थेतील स्थान अधिक मजबूत होईल.

# विकसित भारताच्या दिशेने खंबीर पाऊल: उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/प्रतिनिधी/**केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी सादर केलेला अर्थसंकल्प हा 'आत्मनिर्भर विकसित भारत' घडवणारा असून, यामुळे महाराष्ट्र आणि मुंबईच्या विकासाला नवी गती मिळेल, असा विश्वास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला आहे.

राज्यासाठी महत्त्वाच्या घोषणा आणि फायदे शहरी विकास: ५ लाखांहून अधिक लोकसंख्या असलेल्या शहरांसाठी १२ लाख कोटींचा 'पायाभूत सुविधा फंड' आणि महापालिका बाँड्ससाठी सवलती मिळाल्यामुळे राज्यातील लहान-मोठ्या शहरांचा कायापालट होईल.औद्योगिक क्षेत्र: 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ क्रिएटिव्ह टेक्नॉलॉजी'ची स्थापना, सेमीकंडक्टर (४० हजार कोटी) आणि बायोफार्मा क्षेत्रासाठी झालेली तरतूद महाराष्ट्रातील मॅन्युफॅक्चरिंग हबला बळकटी देईल. कनेक्टिव्हिटी: मुंबई-पुणे आणि पुणे-हैदराबाद हाय-स्पीड रेल्वे कॉरिडॉरमुळे राज्यातील वाहतूक यंत्रणा वेगवान होईल.महिला व रुग्ण कल्याण: 'शी-मार्ट'च्या माध्यमातून महिलांना उद्योजक बनवणे, मुलींसाठी जिल्हास्तरावर हॉस्टेल्स आणि दुर्धर आजारांवरील औषधांचे आयात शुल्क कमी करणे या निर्णयांचे त्यांनी स्वागत केले.

कोकण आणि मत्स्यव्यवसाय: नारळ, काजू उत्पादन आणि मत्स्य उद्योगाला दिलेल्या प्रोत्साहनाचा फायदा महाराष्ट्राच्या किनारपट्टी भागाला होईल.शिंदे यांच्या मते, हा अर्थसंकल्प केवळ वर्तमानाचा विचार करणारा नसून, भविष्यातील 'सबका साथ सबका विकास' हे सूत्र खऱ्या अर्थाने प्रत्यक्षात आणणारा आहे. जागतिक अस्थिरतेच्या काळातही भारताचा विकास दर टिकवून ठेवल्याबद्दल त्यांनी पंतप्रधानांचे कौतुक केले.

# अर्थसंकल्प की सामान्य माणसाच्या जखमेवर मीठ?

देशाचा पोशिंदा उपाशी आणि चैनीच्या वस्तूंना मात्र 'अच्छे दिन'; हा कसला न्याय?

दरवर्षी अर्थसंकल्पाचा मांडव सजतो, घोषणांचा पाऊस पडतो आणि स्वप्नांची मोठी शिदोरी जनतेच्या पदरात टाकली जाते. पण प्रत्यक्षात जेव्हा हा अर्थसंकल्प सामान्यांच्या स्वयंपाकघरात पोहोचतो, तेव्हा कळते की पदरात फक्त महागाईची धग पडली आहे. यंदाही संसदेत बजेट सादर होईल, पण प्रश्न हा आहे की, हे बजेट 'इंडिया'साठी आहे की केवळ मूठभर 'धनिकांच्या' श्रीमंतीवर चकाकी चढवण्यासाठी?

विचित्र विरोधाभास असा की, ज्या वस्तूंशिवाय सामान्य माणसाचा श्वास कोंडतो-मग ते खाद्यतेल असो, गॅस सिलेंडर असो की शेतीची खते-त्यांच्या किमती वाढवताना सरकारचा हात थरथरत नाही. दुसरीकडे, आलिशान कार किंवा महागड्या चैनीच्या वस्तू स्वस्त करून सरकार नक्की कोणाचे भले करू पाहत आहे? कार ही चैनीची वस्तू असू शकते, पण सायकल किंवा दुचाकी ही कष्टकऱ्याच्या रोजीरोटीचे साधन आहे. जेव्हा औषधांच्या किमती आकाशाला भिडतात आणि रुग्णालयाची बिले भरताना गरिबाचे कंबरडे मोडते, तेव्हा लोकशाहीतील 'कल्याणकारी राज्य' ही संकल्पना फक्त कागदावरच उरते.ज्या शेतकऱ्याच्या जीवावर देश जगतो, त्या पोशिंद्याकडेच दुर्लक्ष करण्याची जुनी परंपरा यंदाही कायम राहणार का? खते, बियाणे आणि कीटकनाशके यांच्या किमती कमी करून शेतकऱ्याला बळ देण्याऐवजी, तंत्रज्ञानाच्या गप्पा मारणे म्हणजे 'जखमेवर मीठ चोळण्यासारखे' आहे. जो शेतकरी देशाचे पोट भरतो, त्याच्याच हाताला काही लागणार नसेल, तर त्या प्रगत तंत्रज्ञानाचा उपयोग काय?सरकारला जर महसूलच वाढवायचा असेल, तर दारू, विदेशी मद्य, सिगारेट आणि विलासी हॉटेल्सवर कर का लादला जात नाही? ज्या गोष्टींचा वापर धनिक वर्ग करतो, तिथे कर वाढवल्यास कोणाचेही आयुष्य थांबणार नाही. पण पिठाच्या डब्यापासून ते सिमेंटच्या पोत्यापर्यंत जेव्हा महागाई पोहोचते, तेव्हा गरिबाच्या हक्काच्या घराचे स्वप्न केवळ मातीमोल होते.अर्थसंकल्प असा असावा की ज्यातून गरीब, मजूर आणि शेतकऱ्याच्या चेहऱ्यावर समाधान दिसेल. सर्वसामान्यांचे खिसे कापून तिजोरी भरणे, हे काही प्रगतीचे लक्षण नाही. सरकारने केवळ आश्वासनांची खैरात न करता, जमिनीवर उतरून सामान्य माणसाचा विचार करावा. अन्यथा, हाच 'असंतोष' उद्या जनआक्रोशाच्या रूपात बाहेर पडल्याशिवाय राहणार नाही.

# गांधीजीचे विचार आज मरत चालले की काय?

जगात खास करुन दोन लोकांचा जास्त अभ्यास केला जातो.एक म्हणजे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर व दुसरे राष्ट्रपिता महात्मा गांधी.हे दोघंही गौतम बुद्धाच्या विचाराने प्रेरीत झालेले दिसतात.रणाविण स्वातंत्र्य जर कोणाला मिळाले तर त्यात पहिला क्रमांक भारताचा लागतो.भारतात मुळात दोन गट होते.ज्यावेळी ब्रिटीशांचं राज्य होतं.या ब्रिटीशांना हाकलण्यासाठी देशातील देशभक्ताचे जे दोन गट पडले.

त्या गटाला जहाल व मवाळ गट म्हणत.जहाल गट हा क्रांतीकारी गट होता.मरेल पण सत्यच बोलेल आणि मरेल पण मारुन मरेल.मार खावून मरणार नाही.अशा विचारांचा गट.हा गट ब्रिटीशांना असहकार दाखवत होता.तर दुसरा गट मवाळ गट होता.ह्या गटाचं म्हणणं होतं की जर आपण इंग्रजांना मदत केली,विरोध केला नाही तर एक दिवस इंग्रजांना दया येईल व तो आपल्याला एक दिवस देश चालवायला देवून जाईल.

महात्मा गांधी येण्यापूर्वी इथे आगरकर हे मवाळ गटाचे तर टिळक हे जहाल गटाचे नेते होते.टिळकांनी वेगवेगळ्या क्लृप्त्या वापरुन जनतेत इंग्रजांविरुद्ध असंतोष भारतीय मनात निर्माण केला होता.त्यांनी देशात शिवजयंती गणेशोत्सव सुरु केला होता. त्यांनी स्वदेशी,शिक्षण स्वराज्य आणि बहिस्कार ही चतुसुत्री मांडून जनतेला चेतविले.

त्यांनी मंडालेच्या तुरुंगात शिक्षाही भोगल्या.पण ते फार काळ जीवंत राहिले नाही.एक ऑगस्ट १९२० ला ते मरण पावले.त्यांच्या निधनानंतर देश साधारणतः पोरका झाला होता.आता कोण? देश वाली शोधत होता.अशावेळी या देशाचं नेतृत्व स्विकारलं ते महात्मा गांधी यांनी.

महात्माजींनी बार्डोलीचा सत्याग्रह केला होता.तसेच ते बॅरीस्टर पदवीने विभुषीत असून त्यांनी आफ्रीकेत शेतक-यांसाठी केलेले आंदोलन.चंपारण्याचा सत्याग्रह इत्यादी गोष्टी त्यांनी सहज हाताळल्या होत्या.त्यामुळं या नेतृत्वहिन व पोरक्या झालेल्या समाजाला टिळकानंतर महात्मा गांधीनी नेतृत्वाची आस दाखवली.त्यांनी वेगवेगळ्या मार्गाने का होईना या देशातील समस्त बांधवांना एकत्र आणलं.नव्हे तर असहकार आंदोलनातून,सविनय कायदेभंगातून त्यांनी स्वातंत्र्याची जी ज्योत पेटवली. ती ज्योत वाखाणण्याजोगी आहे.आज आपण भारतीय बहुसंख्य असलो तरी इंग्रजी फौजेसमोर आपला टिकाव लागू शकत नाही हे महात्माजींनी ओळखलं. कारण इंग्रजांजवळ अत्याधुनिक शस्त्रास्त्रे होती.तसेच त्यांच्याकडे आपलीच भारतीय माणसे नोकरी करीत होती.हे इंग्रज एवढे धुर्त होते की ते आपल्याच माणसांकडून आपल्यावरच हल्ला करुन आपल्याच माणसांना नेस्तनाबूत करीत होती.हे मात्र आपल्याच माणसांना कळत नव्हते.जर क्रांतीकारी मार्ग अवलंबला असता तर भारतीय माणसे केव्हाच संपली असती.म्हणून महात्माजींनी अहिंसेच्या मार्गाने इंग्रजांशी लढा द्यायचे ठरवले. त्यांनी लढाईची हत्यारे बनवली.ती हत्यारे म्हणजे सत्य,अहिंसा,सत्याग्रह,असहकार ही होय.गौतम बुद्धांनी सांगीतलेला अहिंसा ह्या तत्वाने तर बुद्धाने सा-या जगाला जिंकलं होतं.हे महात्माजींना माहीत होतं.

आज देश स्वतंत्र्य झाला ती महात्मा गांधीजींचीच देण.आजही देशाला त्यांच्या विचारांची गरज आहे.मरण आलं तरी चालेल,पण मी सत्यच बोलणार हा त्यांचाच संदेश.आजही न्यायालयात याच विचाराने शपथ घेतली जाते.गीतेची शपथ टाकली जाते.

मी शपथ घेतो की मी न्यायाधीशासमोर सत्य बोलेल,खोटं बोलणार नाही.मग बयाणं विचारली जातात.तेव्हा साक्ष द्यायला आलेले लोकं चिकार खोटं बोलतात.शपथ गेली खड्ड्यात.शिवाय वकीलही सर्रास खोटं बोलून केस जिंकून जातात.सत्य पदोपदी मरतं.ही वास्तविकता आहे.आजच्या काळात न्यायालयच नाही तर जागोजागी सत्य चालत नाही.खोटं बोलल्याशिवाय भागत नाही.पोट भरता येत नाही.मग सत्य तरी कोण बोलेल!

आज मितीला जागोजागी रावणाचेच राज्य आहे.रावण तरी बरा होता,पण आज जागोजागी रावण पसरलेले आहेत. कोणी फितूरी करतात.कोणी अत्याचार करतात,कोणी बलत्कार करतात तर कोणी दवाखान्यातच मानवी अवयवाची तस्करी.सर्वत्र खोटं बोलून.....खोटा व्यवहार करुन.

आज देशात कायदेही असेच आहेत.न्यायालयातून आरोपी मोकाट सुटतात तर इमानदार शिक्षेच्या कक्षेत अडकतात.महात्माजींनी तर सविनय कायदेभंग करुन मिठाचा एकच कायदा मोडला.पण आज देशात कितीतरी कायदे मोडावेसे वाटतात.

देश स्वतंत्र असला तरी.महात्माजींनी असहकार दिलं वाईट लोकांना मदत करु नये हाच या असहकाराचा उद्देश. पण आज या असहकाराचा अर्थ आम्ही वेगळाच घेतला.तो म्हणजे चांगल्या गोष्टीला सहकार्य करु नये वाईट गोष्टीला आम्ही सहकार्य करतो. तसेच महात्माजींनी सांगीतलेले सत्याग्रह अर्थात आंदोलन. आम्ही हेही आंदोलन आमच्या स्वतःच्या स्वार्थासाठी करतो.

पर्यायाने सांगायचे झाल्यास आम्ही महात्मा गांधीच्या विचारांची हत्या करीत आज सुटलेलो आहोत.आज आमची बेटी सुरक्षीत नाही.ते इंग्रज तर देश सोडून गेले आपला.

पण या देशावर हे भलतेच इंग्रज येवून बसलेत.जे राज्य तर करीत आहेत. पण त्यांना सर्वसामान्यांचा विचार नाही. त्यामुळंच महात्मा गांधीच्या विचारांची आज हत्या होत असलेली दिसत आहे नव्हे तर त्यांचे विचार मरत चाललेले दिसतात.विशेषतः सांगा.

सांगायचे झाल्यास महात्मा गांधी की ज्यांनी ह्या देशाला स्वतंत्र्य करण्या महत्वपुर्ण योगदान दिलं.त्या महात्माजींनाच मारायला या देशातील समस्त बांधवांनी मागे पुढे पाहिले नाही. त्या देशातील माणसे,महात्मा गांधी कितीही महान असले तरी त्यांचे विचार मांडणार काय?

ही विचार करायला लावणारी बाब आहे.खरंच महात्माजींचे विचार मरत चालले आहेत,जे विचार या देशासाठी क्षणोक्षणी महत्वाचे आहेत याचाही विचार या देशातील लोकांनी करावा.तेच त्यांच्यासाठी खरी श्रद्धांजली ठरेल.

**-अंकुश शिंगाडे, नागपूर**

# 'विकसित भारताचा' कृती आराखडा; आत्मनिर्भरतेकडे नेणारा ऐतिहासिक अर्थसंकल्प: रवींद्र चव्हाण

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/प्रतिनिधी**/ केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी सादर केलेला केंद्रीय अर्थसंकल्प हा केवळ आकड्यांचा खेळ नसून, देशाला आत्मनिर्भर आणि विकसित बनवण्याच्या दिशेने टाकलेले एक ऐतिहासिक पाऊल आहे, असे प्रतिपादन भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी केले. हा अर्थसंकल्प भारताला जगातील तिसरी मोठी अर्थव्यवस्था बनवण्याच्या निर्धाराला बळ देणारा असून सर्वसमावेशक विकासाचा स्पष्ट 'रोडमॅप' मांडणारा आहे, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.भाजपा प्रदेश कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी प्रदेश मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये, प्रदेश प्रवक्ते ओमप्रकाश चौहान आणि पक्षाचे इतर पदाधिकारी उपस्थित होते.

प्रत्येक घटकाचा विचार करणारा अर्थसंकल्प

रवींद्र चव्हाण यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांचे अभिनंदन करताना सांगितले की, या अर्थसंकल्पात शेतकरी, महिला, युवक, मध्यमवर्ग आणि उद्योजक अशा समाजातील प्रत्येक स्तराचा सूक्ष्म विचार करण्यात आला आहे. 'सबका साथ, सबका विकास' या मंत्राला अनुसरून संसाधनांचे वाटप करण्यात आले असून, सर्वसामान्यांच्या क्षमतांचे बळकटीकरण करण्यावर भर देण्यात आला आहे.

पायाभूत सुविधा आणि रोजगाराला गती

अर्थसंकल्पातील महत्त्वाच्या तरतुदींवर प्रकाश टाकताना चव्हाण यांनी खालील मुद्दे अधोरेखित केले:

पायाभूत सुविधा: रस्ते, रेल्वे, मेट्रो, बंदरे आणि ऊर्जा क्षेत्रातील गुंतवणुकीमुळे अर्थव्यवस्थेला नवी गती मिळेल. विशेषतः पायाभूत सुविधांवरील खर्चामुळे लाखो रोजगाराच्या संधी निर्माण होतील.

रेल्वे आणि कनेक्टिव्हिटी: मुंबई ते पुणे आणि पुणे ते हैदराबाद यांसारख्या ७ हाय-स्पीड रेल्वे कॉरिडॉर्सची घोषणा ही विकसित भारताची प्रबळ इच्छाशक्ती दर्शवते.

शहरी विकास: ५ लाखांहून अधिक लोकसंख्या असलेल्या शहरांमधील सोयीसुविधा वाढवण्यासाठी १२.२ लाख कोटी रुपयांची भरघोस तरतूद करण्यात आली आहे.

औद्योगिक आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील मोठी झेप

भारताला जागतिक उत्पादन केंद्र बनवण्यासाठी अर्थसंकल्पात विशेष तरतुदी आहेत:

बायो फार्मा शक्ती: देशाला जागतिक



बायो-फार्मा हब बनवण्यासाठी १०,००० कोटी रुपयांची तरतूद.

सेमीकंडक्टर मिशन: तंत्रज्ञान क्षेत्रात आत्मनिर्भर होण्यासाठी ४०,००० कोटी रुपयांचा निधी जाहीर.

चडचए ला आधार: लघु आणि मध्यम उद्योगांना मदत करण्यासाठी 'स्वावलंबी भारत निधी'ची निर्मिती.

ऊर्जा आणि पर्यावरण: ऊर्जा सुरक्षेवर भर देतानाच पर्यावरणपूरक प्रवासी वाहतुकीला प्रोत्साहन देण्यात आले आहे.

पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वाखाली देश प्रगतीच्या नव्या शिखराकडे वेगाने वाटचाल करत आहे. वाराणसी आणि पटना येथे जहाज केंद्रांची उभारणी, तसेच आंध्र प्रदेश, ओडिसा आणि केरळमधील खनिज कॉरिडॉर हे भारताच्या आर्थिक समृद्धीचे नवे मार्ग ठरतील, असा विश्वास चव्हाण यांनी व्यक्त केला.

भाजपा प्रदेश कार्यालयात रविवारी या अर्थसंकल्पाचे थेट प्रक्षेपण पाहण्यासाठी विविध क्षेत्रांतील तज्ज्ञ आणि पक्ष पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा अर्थसंकल्प भारताच्या उज्ज्वल भविष्याचा पाया रचणारा आहे, असे मत उपस्थितांनी यावेळी व्यक्त केले.

# पक्षाशी गद्दारी म्हणजे आईशी विश्वासघात!' बावनकुळेंचा घरचा रस्ता दाखवण्याचा बंडखोरांना कडक इशारा

आत्ताच एक्सप्रेस

परभणी/प्रतिनिधी/जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीच्या रणधुमाळीने परभणीतील राजकीय वातावरण चांगलंच तापलं आहे. याच पार्श्वभूमीवर भाजपचे दिग्गज नेते आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी रविवारी जिल्ह्यात तुफानी प्रचार दौरा केला. एकाच दिवसात पाच जाहीर सभांचा धडाका लावत त्यांनी विरोधकांवर हल्लाबोल केलाच, पण पक्षांतर्गत कुरघोड्या करणाऱ्यांना आणि बंडखोरांना अत्यंत कडक शब्दांत तंबी दिली आहे.पक्षात राहून पक्षाच्या अधिकृत उमेदवाराचा घात करणे, म्हणजे स्वतःच्या आईशी विश्वासघात करण्यासारखे आहे. अशा गद्दारांना निवडणुकीनंतर पक्षात जागा नाही, त्यांना थेट घरचा रस्ता दाखवला जाईल, अशा शब्दांत बावनकुळे यांनी आपला संताप व्यक्त केला. हेलिकॉप्टरने गाठली जिल्ह्याची दोन टोकेनिवडणुकीच्या प्रचारासाठी बावनकुळे यांनी पूर्ण ताकद झोकून दिली आहे. रविवारी त्यांनी हेलिकॉप्टरने जिंतूर ते गंगाखेड अशी जिल्ह्याची दोन टोके गाठली. त्यांच्यासोबत पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांचीही उपस्थिती होती. जिंतूर तालुक्यातील इटोली, झरी, दैठणा, महातपुरी आणि वडगाव अशा पाच ठिकाणी त्यांनी जनसमुदायाला संबोधित केले.बंडखोरांचे धाबे दणाणलेनिवडणुकीच्या



काळात अनेक ठिकाणी पक्षांतर्गत नाराजी आणि छुपा विरोध पाहायला मिळतो. परभणीतही अशीच काहीशी परिस्थिती असल्याच्या पार्श्वभूमीवर बावनकुळे यांनी आक्रमक पवित्रा घेतला. शिस्तभंग खपवून घेणार नाही: पक्षात पदे भोगायची आणि ऐन निवडणुकीत उमेदवाराला पाडण्याचे काम करायचे, ही वृत्ती भाजपमध्ये चालणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.निवडणुकीनंतर कारवाईचा बडगा: सध्या प्रचाराचा जोर असला तरी, प्रत्येक कार्यकर्त्याच्या आणि नेत्याच्या हालचालींवर पक्षश्रेष्ठींचे लक्ष आहे. ज्यांनी विरोधात काम केले, त्यांची गय केली जाणार नाही.विकासाच्या मुद्द्यावर मतदारांना सादकेवळ इशाराच नव्हे, तर बावनकुळे यांनी भाजप सरकारने केलेल्या विकासकामांचा पाढाही यावेळी वाचला. जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांमध्ये भाजपची सत्ता आल्यास विकासाचा डोंगर उभा करू, असे आश्वासन देत त्यांनी उमेदवारांना बहुमताने विजयी करण्याचे आवाहन केले.थोडक्यात महत्त्वाचे मुद्दे: घटकतपशीलप्रमुख वक्ताचंद्रशेखर बावनकुळे (महसूल मंत्री) ठिकाणपरभणी जिल्हा (५ सभा) प्रमुख उपस्थितीपालकमंत्री मेघना बोर्डीकर इशार ापक्षाशी विश्वासघात करणाऱ्यांना पक्षातून डच्चूबावनकुळे यांच्या या 'आक्रमक' अवतारामुळे परभणीतील भाजप कार्यकर्त्यांमध्ये चैतन्य पसरले असले, तरी पक्षांतर्गत छुपी बंडाळी करणाऱ्यांचे मात्र धाबे दणाणले आहेत.

# ढोलकी सम्राट पांडुरंग घोटकर यांना प्रथम 'जेईएस कलासाधना पुरस्कार' प्रदान

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)**आपल्या बहारदार ढोलकी वादनाने संपूर्ण महाराष्ट्राला मंत्रमुग्ध करणारे आणि जागतिक स्तरावर मराठी लोकसंस्कृतीची मोहोर उमटवणारे सुप्रसिद्ध ढोलकी सम्राट पांडुरंग घोटकर यांना जालना येथील जेईएस (JES) महाविद्यालयाच्या वतीने दिला जाणारा पहिला 'जेईएस कलासाधना पुरस्कार' अत्यंत उत्साहात प्रदान करण्यात आला. लोककलेच्या क्षेत्रात आयुष्य वेचणाऱ्या या महान कलाकाराचा सन्मान सोहळा जालना शहरासाठी एक सांस्कृतिक पर्वणी आणि ऐतिहासिक क्षण ठरला.

दिग्गजांची उपस्थिती आणि सोहळ्याचे स्वरूप

महाविद्यालयाच्या चुन्नीलाल जी. गोयल सभागृहात हा भव्य सोहळा पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष पुरुषोत्तम बगडिया होते. व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून नांदेडचे सुप्रसिद्ध शाहीर रमेश गिरी, लोककला अभ्यासक शाहीर आप्पासाहेब उगले, प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री, मराठी विभाग प्रमुख डॉ. यशवंत सोनुने, शाहीर रामानंद उगले आणि लोककला विभाग प्रमुख कल्याण उगले यांची विशेष उपस्थिती होती.

या नवीन उपक्रमाची माहिती देताना प्राचार्य डॉ. अग्निहोत्री म्हणाले की, लोककला क्षेत्रात सातत्यपूर्ण आणि निष्ठेने कार्य करणाऱ्या कलाकारांचा गौरव व्हावा, या उद्देशाने महाविद्यालयाने 'जेईएस कलासाधना पुरस्कार' सुरू केला आहे.

हा सन्मान प्रत्येक लोककलावंताचा - पांडुरंग घोटकर




पुरस्कार स्वीकारल्यानंतर सत्काराला उत्तर देताना पांडुरंग घोटकर भावूक झाले. आपल्या भावना व्यक्त करताना ते म्हणाले,

हा सन्मान केवळ माझा एकट्याचा नसून, माझ्या ढोलकीचा आणि रक्ताचे पाणी करून लोककला जिवंत ठेवणाऱ्या प्रत्येक कलावंताचा आहे.

लोककलेची ही समृद्ध परंपरा पुढच्या पिढीपर्यंत सक्षमपणे पोहोचवणे हेच माझ्या जीवनाचे अंतिम ध्येय आहे. जेईएस महाविद्यालयाने घेतलेला हा पुढाकार आम्हा कलावंतांसाठी मोठी प्रेरणा ठरेल.

पांडुरंग घोटकर: एक देदीप्यमान प्रवास

पांडुरंग घोटकर यांचा जीवनप्रवास थक्क करणारा आहे.

सुरुवात: वयाच्या अवघ्या १० व्या वर्षापासून त्यांनी ढोलकीशी नाते जोडले.

सहभाग: लावणीसम्राज्ञींपासून ते अनेक नामवंत संगीतकार आणि गायिकांच्या ध्वनिमुद्रिकांपर्यंत (ठशलेीवळपसी) त्यांनी आपले वादन कौशल्य सिद्ध केले आहे.

बहुमान: त्यांना यापूर्वी 'महाराष्ट्र भूषण' आणि 'संगीत नाटक अकादमी' यांसारख्या सर्वोच्च नागरी सन्मानांनी गौरवण्यात आले आहे.

जागतिक वारसा: केवळ भारतातच नव्हे, तर परदेशातही त्यांनी महाराष्ट्राच्या ढोलकीचा आवाज पोहोचवला आहे. वादनासोबतच त्यांनी अनेक शिष्य घडवून ढोलकीची गुरुपरंपरा आजही जिवंत ठेवली आहे.

रसिक आणि विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

मराठी विभाग आणि लोककला विभागाच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे नेटके नियोजन करण्यात आले होते. जेईएस कलासाधना पुरस्काराच्या माध्यमातून खऱ्या अर्थाने मातीतील कलाकारांना हक्काचे व्यासपीठ मिळाले आहे, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन माधवी माळी यांनी केले, तर प्रा. कल्याण उगले यांनी उपस्थितांचे आभार मानले. या सोहळ्याला शहरातील रसिक नागरिक, विद्यार्थी आणि प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राज्याचे 'खंबीर नेतृत्व', मराठवाड्याचा 'आधारवड' कोसळला!

प्रशासनावरील ज्यांची 'वचक', कामाचा 'उरक' पाहून अधिकारीही थक्क व्हायचे, असे संपूर्ण राज्याचे खंबीर नेतृत्व हरपले. अजित (दादा) पवार केवळ एका जिल्ह्याचे मर्यादित नेतृत्व नव्हते, तर ते राज्याचे उपमुख्यमंत्री, वित्त व नियोजन मंत्री आणि अल्पसंख्याक विकास मंत्री म्हणून राज्याचा गाडा समर्थपणे हाकत. ते राज्याचे नेते होतेच, पण त्याही पलीकडे जाऊन मराठवाडा विभागावर त्यांचा विशेष लोभ होता. दादा मूळचे पश्चिम महाराष्ट्राचे, पण धाराशिव त्यांचे सासर. त्यामुळे मराठवाड्याचे 'जावई' म्हणून त्यांचा या भागावर जीव होताच, पण बीड जिल्ह्याचे 'पालकमंत्री' म्हणून त्यांनी जिल्ह्याला पितृवत प्रेम दिले.

**तखत श्री हजूर अबचलनगर साहिब जी गुरुद्वारातील ती 'अखेरची' भेट**

अवघ्या दोन दिवसांपूर्वी, २५ जानेवारीला दादा मराठवाडा विभागाच्या दौऱ्यावर, नांदेडच्या पवित्र भूमीत होते. नांदेड येथील 'तखत सचखंड श्री हजूर अबचल नगर साहिब' गुरुद्वारात ते नतमस्तक झाले. सुरुवातीला उपमुख्यमंत्री अजित पवार, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील आणि आमदार प्रताप पाटील चिखलीकर यांनी पवित्र गुरुद्वारात अत्यंत भक्तीभावाने दर्शन घेतले. 'कडा प्रसाद' ग्रहण केला. यावेळी त्यांच्या चेहऱ्यावर समाधान होते. दर्शन झाल्यानंतर ते गुरुद्वारा परिसरात थांबले. 'तखत सचखंड श्री हजूर अबचल नगर साहिब'जीं चे दर्शन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस घेऊन, बाहेर येईपर्यंत दादा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची वाट पाहत होते. त्यानंतर मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व इतर सर्व मंत्री महोदय यांनी पवित्र गुरुद्वारातून एकत्रितपणे ऐतिहासिक 'हिंद-दी-चादर' श्री गुरु तेग बहादूर साहिब जी यांच्या ३५० व्या शताब्दी समागम कार्यक्रमासाठी मोदी मैदानाकडे प्रस्थान केले. राज्याचे नेतृत्व म्हणून ज्येष्ठता आणि पदाचा मान राखण्याची त्यांची ही कृती सर्वांनाच भावली. गुरुद्वारा बोर्डाचे प्रशासक डॉ. विजय सतबीर सिंघ जी यांनी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि उपस्थित सर्व मान्यवरांचा यावेळी सन्मान केला.

पालकमंत्र्यांचा 'धडाका' आणि 'विक्रमी नोंद '

बीडमध्ये त्यांनी विकासाचा विक्रम रचला होता. १ जानेवारी २०२६ ला वर्षाच्या पहिल्याच दिवशी त्यांनी बीडमध्ये एकाच वेळी १३६३ विकासकामांचे उद्घाटन आणि भूमिपूजन करून प्रशासनालाही अवाक केले होते.

केवळ इमारती नाहीत, तर निसर्गाशी नाते जोडत त्यांच्याच उपस्थितीत बीडमध्ये एकाच दिवशी ३० लाखांहून अधिक वृक्ष लागवड करण्यात आली. याची नोंद 'इंडिया रेकॉर्ड' (खपवळर ठशलेीवी) मध्ये झाली. तरुणांवर त्यांचे विशेष प्रेम होते, म्हणूनच खेळाडूंसाठी क्रीडा विभागाचा २५ कोटींचा निधी मंजूर करून त्यांनी आंतरराष्ट्रीय दर्जाचे 'टर्फ ग्राउंड' बीडकरांना दिले.सहकार आणि अर्थाची जोड

प्रशासकीय शिस्तीचे भोक्ते असलेल्या दादांनी बीडमध्ये सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या विभागाच्या भव्य 'सहकार संकुला'चे भूमिपूजन केले. सर्व सहकारी कार्यालये एकाच छताखाली असावीत, हा त्यांचा आग्रह होता. राज्याचे वित्त व नियोजन मंत्री या नात्याने त्यांनी बीडच्या विकासाला कधीच निधी कमी पडू दिला नाही. १७ सप्टेंबर २०२५ ला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते 'अहिल्यानगर-बीड' रेल्वेचे उद्घाटन झाले. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी २ हजार कोटींपेक्षा जास्त निधी आणि ऐनवेळी दिलेले १५० कोटी रुपये, ही अर्थमंत्री म्हणून दादांनीच मंजूर केले होते.

**हृदयाची काळजी घेणारे 'दादा'**

बीड जिल्हा रुग्णालयात 'कार्डियाक कॅथलॅब' देऊन त्यांनी गोरगरिबांच्या हृदयाची सोय केली. दुर्दैवाने, बीडकरांच्या हृदयाची काळजी घेणाऱ्या पालकमंत्र्यांचे हृदय मात्र आज थांबले.

एकीकडे राज्याच्या अर्थव्यवस्थेचे सुकाणू समर्थपणे सांभाळणारे 'वित्त व नियोजन मंत्री' आणि दुसरीकडे बीडच्या प्रत्येक प्रश्नावर बारकाईने लक्ष घालणारे 'पालकमंत्री'... अशी दुहेरी भूमिका त्यांनी समर्थपणे पेलली. धाराशिवचे जावई आणि बीडचे पालक असलेल्या या विकासपुरुषाला भावपूर्ण श्रद्धांजली!

**- डॉ. श्याम टरके**
**सहायक संचालक (माहिती),**
**विभागीय माहिती कार्यालय, लातूर.**

# बिडकीन पोलिसांचा थरार!

## तलवारी उपसून दहशत माजवणारी टोळी जेरबंद; १० लाखांचा ट्रक अन् शस्त्रांसह मोठा मुद्देमाल जप्त

**आत्ताच एक्सप्रेस**

**बिडकीन (पैठण)/प्रतिनिधी/** छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात जिल्हाधिकाऱ्यांनी शस्त्रास्त्र बंदीचा आदेश लागू केलेला असतानाही, कायद्याची पायमल्ली करणाऱ्या गुंडांच्या बिडकीन पोलिसांनी मुसक्या आवळल्या आहेत. गुरुवारी मध्यरात्रीच्या सुमारास नीलजगाव फाटा परिसरात तलवारींसह दहशत निर्माण करण्याच्या तयारीत असलेल्या तीन सराईत गुन्हेगारांना पोलिसांनी फिल्मी स्टाईलने पाठलाग करून अटक केली. या कारवाईत पोलिसांनी तब्बल १० लाख ६० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

मध्यरात्रीचा थरार आणि पोलिसांची झडप

जिल्हा दंडाधिकाऱ्यांच्या शस्त्रास्त्र आणि निःशस्त्रीकरण आदेशाचे (-ऊऊ २९/१) उल्लंघन होत असल्याची कुणकुण पोलिसांना लागली होती. गुरुवारी रात्री ११:१५ च्या सुमारास, नीलजगाव फाटा येथील पेट्रोल पंपाजवळ काही संशयित हालचाली सुरू असल्याची माहिती बिडकीन पोलिसांना मिळाली. एपीआय नीलेश शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने सापळा रचला आणि दहशत निर्माण करण्याच्या उद्देशाने वावरणाऱ्या तिघांना रंगेहात पकडले.

> शहरात आणि ग्रामीण भागात शांतता भंग करणाऱ्यांची गय केली जाणार नाही. शस्त्र बाळगणे आणि दहशत निर्माण करणे महागात पडेल!
> **- पोलीस प्रशासन.**

या आरोपींच्या आवळल्या मुसक्या

अटक करण्यात आलेले आरोपी हे वेगवेगळ्या भागांतील असून त्यांचे धागेदोरे कोठपर्यंत आहेत, याचा तपास पोलीस करत आहेत.कृष्णा नामदेव दिंडे (वय २६) - रा. पारदरी, ता. जि. छत्रपती संभाजीनगर,संतोष रमेश जगदाळे (वय ३१) - रा. कल्याण नगर, बिडकीन, ता. पैठण,सुनील अशोक चांदणे (वय २५) - रा. मार्गवण, ता. अंबड, जि. जालना,ङ्ख जप्त केलेला मुद्देमाल: रक्ताने माखण्याआधीच तलवारी पोलिसांच्या ताब्यात! पोलिसांनी केलेल्या या कारवाईत केवळ शस्त्रेच नाही, तर गुन्ह्यात वापरलेली मोठी वाहनेही जप्त केली आहेत.दोन धारदार तलवारी: ८४ सेमी आणि ७३ सेमी लांबीच्या दोन लोखंडी तलवारी, ज्या लाल मखमली म्यानात लपवून एका भगव्या




पोत्यात गुंडाळून ठेवल्या होत्या.

१८ टायरचा टाटा ट्रक: (क्र. MH20 GC 9809) - किंमत अंदाजे १० लाख रुपये,बजाज सिटी १०० बाईक: (क्र. MH20-P 6728),मोबाईल फोन्स: आरोपींकडून वनप्लस, टेक्नो आणि रेडमी कंपनीचे ३ महागडे फोन जप्त,एकूण जप्त मुद्देमाल: १०,६०,००० (दहा लाख साठ हजार रुपये)

कारवाई करणारे 'शूरवीर'

ही यशस्वी आणि धडक कारवाई बिडकीनचे एपीआय नीलेश शेळके यांच्या नेतृत्वाखाली, पीएसआय संभाजी झिजुर्डे, अजिनाथ शेकडे, हनुमान धनवे, उबाळे आणि पोलीस कर्मचाऱ्यांच्या पथकाने पार पाडली. या कारवाईमुळे परिसरात दहशत माजवणाऱ्या गुंडांचे धाबे दणाणले आहेत.

## संक्षिप्त

### निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पैठण एमआयडीसी पोलिसांचे 'रूट मार्च'; ड्रोन कॅमेऱ्याद्वारे ठेवली जाणार करडी नजर



**आत्ताच एक्सप्रेस**

**पिंपळवाडी/हारून शेख/** आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुका निर्भय, पारदर्शक आणि शांततेत पार पाडण्यासाठी पैठण एमआयडीसी पोलिसांनी कंबर कसली आहे. निवडणुकीच्या काळात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी आणि मतदारांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण करण्यासाठी पोलीस ठाण्याच्या हद्दीत मंगळवारी भव्य 'पथ संचलन' (रूट मार्च) करण्यात आले.

महत्त्वाच्या गावांमध्ये पोलिसांचा संचलन

सहाय्यक पोलीस निरीक्षक ईश्वर जगदाळे यांच्या मार्गदर्शनाखाली हे पथ संचलन आयोजित करण्यात आले होते. पोलिसांनी पिंपळवाडी (पि), ढोरकीन आणि बालानगर यांसारख्या संवेदनशील आणि महत्त्वाच्या गावांच्या मुख्य बाजारपेठेतून आणि गल्लीबोळातून संचलन केले. यावेळी ग्रामस्थांशी संवाद साधून कोणत्याही अफवांना बळी न पडण्याचे आवाहन करण्यात आले.

ड्रोन कॅमेऱ्यांचा प्रथमच वापर

या पथ संचलनाचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे पोलिसांकडून तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्यात आला. संचलनादरम्यान ड्रोन कॅमेऱ्यांद्वारे परिसराचे चित्रीकरण करण्यात आले. गर्दीच्या जागा, संशयास्पद हालचाली आणि गावातील भौगोलिक परिस्थितीवर नजर ठेवण्यासाठी ड्रोनचा वापर केल्याने गुन्हेगारांचे धाबे दणाणले आहेत.

पथ संचलनात सहभागी अधिकारी व कर्मचारी

या संचलनात मोठ्या संख्येने पोलीस फौजफाटा तैनात होता. यामध्ये प्रामुख्याने अधिकारी सपोनि ईश्वर जगदाळे, पोलीस उपनिरीक्षक दशरथ बुरकुल, कविता जगताप,पोलीस कर्मचारी कर्तारसिंग सिंगल, राहुल मोहतमल, अमोल पवार, ज्ञानेश्वर भवर, अंकुश राहटवाड, रामेश्वर पंडित, जीवन गुडेकर, रागिणी कदम, नंदा बिरुटे,विशेष पथक: राज्य राखीव पोलीस दलाच्या (RCP) पथकातील जवानही या संचलनात पूर्ण तयारीनिशी सहभागी झाले होते.निवडणुकीच्या रणधुमाळीत कोणत्याही प्रकारचा अनुचित प्रकार घडू नये, यासाठी एमआयडीसी पोलिसांनी दाखवलेल्या या तत्परतेचे नागरिक कौतुक करत आहेत. निवडणूक काळात शांतता भंग करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल, असा स्पष्ट इशारा या संचलनाच्या माध्यमातून देण्यात आला आहे.

### मुक्त विद्यापीठात संत रविदास महाराज जयंती साजरी

**आत्ताच एक्सप्रेस/ नाशिक (प्रतिनिधी)** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात संत रविदास महाराज यांची ६४९ वी जयंती साजरी करण्यात आली. मुख्य प्रशासकीय इमारतीत झालेल्या कार्यक्रमाच्या अधायक्षस्थानी विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे होते. सहाय्यक कक्ष अधिकारी श्रीमती माधुरी देशपांडे व वरिष्ठ सहाय्यक श्रीमती सुमेधा थोरमिसे यांच्या हस्ते संत रविदास महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी बोलतांना विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. सोनवणे म्हणाले की महाराष्ट्रासह संपूर्ण भारत देशाला संत परंपरेचा मोठा वारसा आहे.

**दैनिक आत्ताच एक्सप्रेस बातमीचा दणका**

## गंगापूर पालिकेने घेतली दखल, प्रभाग ५ मध्ये अखेर घंटागाडी सुरू

**आत्ताच एक्सप्रेस**

**गंगापूर (प्रतिनिधी- सुभान शहा)** प्रशासकीय दिरंगाई आणि लोकप्रतिनिधींच्या दुर्लक्षामुळे कचरा कोंडीचा सामना करणाऱ्या गंगापूर शहरातील प्रभाग क्रमांक ५ मधील नागरिकांना अखेर दिलासा मिळाला आहे. **'दैनिक आत्ताच एक्सप्रेस'**मध्ये यासंदर्भात बातमी प्रसिद्ध होताच, नगरपालिका प्रशासनाने तातडीने दखल घेत या परिसरात नियमित घंटागाडी सुरू केली आहे.

काय होती समस्या? गंगापूर शहरातील प्रभाग क्रमांक ५ मधील जुना यश कॉम्प्युटर परिसरात गेल्या अनेक दिवसांपासून घंटागाडी येत नव्हती. आठवड्यातून एकदा किंवा पंधरा दिवसातून एकदा गाडी येत असल्याने कचऱ्याचे ढीग साचले होते.

यामुळे परिसरात दुर्गंधी पसरून नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला होता. स्थानिक नागरिकांनी वारंवार तक्रारी करूनही नगरपालिका अधिकारी आणि लोकप्रतिनिधी याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याची भावना नागरिकांमध्ये निर्माण झाली होती.






निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र
आत्ताच एक्सप्रेस

गंगापूर, प्र. क्र. (५) यश कम्प्युटर या परिसरात घंटागाडी कचरा घेण्यासाठी येत नसल्याने नागरिकांची गैरसोय

आत्ताच एक्सप्रेस 9860753464

गंगापूर/ प्रतिनिधी/ सुभान शहा/ गंगापूर नगरपालिकेच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह? गंगापूर शहरातील प्रभाग क्रमांक (५) जुना मांजरी रोड यश कम्प्युटर या परिसरात घंटागाडी कचरा उचलण्यासाठी येत नसल्यामुळे नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे. घंटागाडी चालक त्यांना वेळोवेळी फोन करून नागरिकांनी सांगितलं की आमच्या प्रभाग क्रमांक (५) मध्ये गाडी पाठवा परंतु घंटा गाडी चालकाकडून सांगण्यात येत आहे की मी आज सुट्टीवर आहे. उद्या ड्युटीवर राहील माझ्या जागेवर कोण आहे मला माहित नाही. मी ड्युटीवर आल्यावर तुमच्या परिसरात गाडी घेऊन

बातमीचा परिणाम: या गंभीर समस्येवर **'दैनिक आत्ताच एक्सप्रेस'**ने प्रकाश टाकताच प्रशासकीय यंत्रणा कामाला लागली. बातमी प्रसिद्ध झाल्यानंतर तातडीने लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाच्या पुढाकाराने या भागात घंटागाडी पाठवण्यात आली. कचरा उचलण्याचे काम युद्धपातळीवर सुरू झाल्याने नागरिकांनी सुटकेचा निःश्वास सोडला आहे.

नागरिकांची मागणी: प्रशासनाने दाखवलेली ही तत्परता केवळ बातमीपुरती मर्यादित न राहता, भविष्यातही या प्रभागात नियमितपणे घंटागाडी पाठवावी, अशी मागणी स्थानिक रहिवाशांनी केली आहे. तसेच, नगरपालिकेने नागरिकांना मिळणाऱ्या मूलभूत सुविधांकडे कायमस्वरूपी लक्ष द्यावे, अशी अपेक्षाही व्यक्त करण्यात येत आहे.

नगरपालिकेच्या या निर्णयाबद्दल आणि **'आत्ताच एक्सप्रेस'**च्या पाठपुराव्याबद्दल परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त करत आभार मानले आहेत. आता प्रशासनाकडून या मूलभूत सोयी कायमस्वरूपी मिळतात का? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### महाराष्ट्र लोकभवन येथे संत शिरोमणी रविदास महाराज यांना जयंतीनिमित्त अभिवादन

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी**/१ फेब्रुवारी २०२६: समता, बंधुता आणि मानवतेचा संदेश देणारे महान संत शिरोमणी रविदास महाराज यांची जयंती आज देशभरात उत्साहात साजरी होत आहे. याच निमित्ताने मुंबईतील महाराष्ट्र लोकभवन येथे संत रविदास महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले.

पुष्पांजली अर्पण करून मानवंदना

कार्यक्रमाच्या सुरुवातीला राज्यपालांचे परिवार प्रबंधक डॉ. निशिकांत देशपांडे यांनी संत रविदास महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण केली. यावेळी त्यांनी संतांच्या विचारांची आजच्या काळात असलेली गरज आणि त्यांच्या सामाजिक कार्याचा गौरव केला.

अधिकारी व कर्मचाऱ्यांची उपस्थिती

या अभिवादन कार्यक्रमाला लोकभवनातील विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच, लोकभवन येथे सुरक्षेसाठी तैनात असलेले पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांनीही रांगेत उभे राहून संतांच्या प्रतिमेचे दर्शन घेतले आणि त्यांना अभिवादन केले.

संत रविदास महाराज यांनी आपल्या साहित्यातून आणि उपदेशातून समाजातील भेदभाव दूर करण्याचा प्रयत्न केला. मन चंगा तो कटौती में गंगा असा सुविचार देणाऱ्या या महान संतांचे विचार सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी अशा शासकीय उपक्रमांचे आयोजन करण्यात येते. लोकभवन परिसरात आज भक्तीमय आणि उत्साही वातावरण पाहायला मिळाले.

## बोरसर गटात परिवर्तनाचे वादळ! प्रस्थापितांचे धाबे दणाणले

### गोरखासिंग जारवाल यांचा 'झाडू'ने मैदानात धडाका

**आत्ताच एक्सप्रेस**

**वैजापूर (प्रतिनिधी)** आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीच्या रणधुमाळीत २९ बोरसर गटातून आम आदमी पार्टीचे अधिकृत उमेदवार श्री. गोरखासिंग सांडूसिंग जारवाल यांनी प्रचारात मोठी आघाडी घेतली आहे. वर्षानुवर्षे सत्तेत असलेल्यांना आता जनतेच्या रोषाला सामोरे जावे लागत असून, जारवाल यांच्या 'प्रामाणिकपणा' आणि 'कामाच्या अनुभवा'मुळे विरोधकांच्या गोटात अस्वस्थता पसरली आहे.



प्रस्थापितांच्या 'राजकारणाला' जारवाल यांचे 'कामाचे' आव्हान!

बी.एस्सी. शिक्षण पूर्ण करून १९९३ ते २०२१ पर्यंत ग्रामसेवक आणि ग्रामविकास अधिकारी म्हणून प्रदीर्घ सेवा दिलेल्या जारवाल यांच्याकडे प्रशासकीय कामाचा दांडगा अनुभव आहे. केवळ घोषणाबाजी करणाऱ्या नेत्यांच्या तुलनेत, शासनाच्या योजना तळागाळातील सामान्य माणसापर्यंत कशा पोहोचवायच्या, याची नस त्यांना माहित आहे. याच अनुभवाच्या जोरावर त्यांनी बोरसर गटाच्या सर्वांगीण विकासाचा १८ कलमी जाहीरनामा प्रसिद्ध करून प्रस्थापितांना उघड आव्हान दिले आहे.

जनतेसाठीचा ठोस 'संकल्प': १८ कलमी कार्यक्रम

जारवाल यांनी आपल्या जाहीरनाम्यातून केवळ आश्वासने न देता ठोस कामांची यादीच सादर केली आहे.

**पाणी प्रश्न:** जलजीवन मिशन अंतर्गत प्रत्येक घरात शुद्ध पाण्याचा संकल्प,**शिक्षण व आरोग्य:** शाळांचे सक्षमीकरण आणि मोफत आरोग्य शिबिरांसह 'आयुष्मान भारत' कार्डाचे वाटप,**महिला व युवक:** महिलांना शिलाई मशीन, पिठाची गिरणी आणि १२ वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना लॅपटॉप/संगणक मिळवून देण्याचा शब्द,**शेतकरी व कामगार:** कृषी स्वाभिमान आणि पशुसंवर्धन योजनांच्या लाभाची थेट अंमलबजावणी, **वंचितांना न्याय:** दिव्यांग बांधवांना सायकली, आर्थिक मदत आणि तांडा वस्ती सुधार योजनेवर विशेष भर.

**'घराणेशाही' विरुद्ध 'सामान्य माणूस'**

जारवाल यांच्या पत्नी सौ. शांताबाई जारवाल यांनी यापूर्वी हाजीपूरवाडी येथे सरपंच म्हणून काम करताना विकासाची गंगा आणली होती. आता तोच वारसा घेऊन गोरखासिंग जारवाल रिंगणात उतरले आहेत. निवेदन आणि आंदोलनांच्या माध्यमातून मी आतापर्यंत जनतेचे प्रश्न मांडले आहेत, आता जिल्हा परिषदेच्या माध्यमातून ते सोडवण्याची वेळ आली आहे, असा आक्रमक पवित्रा जारवाल यांनी घेतला आहे.

**७ फेब्रुवारीला 'झाडू' चालणार?**

येत्या गुरुवार, ७ फेब्रुवारी २०२६ रोजी मतदान होणार आहे. अनुक्रम क्रमांक २ समोरील 'झाडू' या निशाणीवर बटण दाबून भ्रष्टाचाराची घाण साफ करण्याचे आवाहन त्यांनी केले आहे. बोरसर गटातील सुशिक्षित आणि सजग मतदारांचा कल पाहता, यावेळी प्रस्थापितांची खुर्ची धोक्यात असल्याचे चित्र स्पष्ट दिसत आहे.

## फुलंब्रीत भाजपला मोठा धक्का; बाबुळगावचे सरपंच गंगाधर मोरे यांचा 'मशाल' हाती घेत शिवसेनेत प्रवेश

**आत्ताच एक्सप्रेस**

**फुलंब्री (प्रतिनिधी/ सरफराज पटेल)** राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे वारे वाहत असतानाच फुलंब्री तालुक्यातील राजकीय समीकरणे वेगाने बदलू लागली आहेत. तालुक्यातील बाबरा जिल्हा परिषद गटातील बाबुळगाव खुर्दचे विद्यमान सरपंच आणि भाजपचे खंबीर नेते गंगाधर मोरे यांनी आपल्या असंख्य समर्थकांसह शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षात जाहीर प्रवेश केला आहे. या पक्षप्रवेशामुळे परिसरात भाजपला मोठा धक्का मानला जात असून महाविकास आघाडीची ताकद वाढली आहे.

**दिग्गजांच्या उपस्थितीत 'सोहळा' संपन्न**

हा पक्षप्रवेश सोहळा शिवसेना आणि महाविकास आघाडीच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत पार पडला. यावेळी शिवसेनेचे (उद्धव बाळासाहेब ठाकरे) उमेदवार मनोहर पाटील सोनवणे आणि काँग्रेसचे उमेदवार रवी जंगले यांच्यासह महाविकास आघाडीचे दिग्गज नेते उपस्थित होते.

प्रवेशावेळी उपस्थित प्रमुख नेते कचरू मैंद, सभापती सोमनाथ करपे, शिवसेना तालुकाप्रमुख राजेंद्र चव्हाण, संजय मोटे, प्रभाकर वाघ, सोमनाथ मोरे यांसह महाविकास आघाडीचे शेकडो कार्यकर्ते होते. निवडणुकीवर होणार मोठा परिणाम गंगाधर मोरे हे बाबुळगाव परिसरातील एक प्रभावी लोकप्रतिनिधी म्हणून ओळखले जातात. त्यांच्या या निर्णयामुळे आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीत महाविकास आघाडीच्या उमेदवारांना मोठे बळ मिळणार आहे. विशेषतः बाबरा जिल्हा परिषद गटात महाविकास आघाडीची पकड आता अधिक मजबूत झाल्याचे राजकीय विश्लेषकांचे मत आहे.




**का झाला हा पक्षबदल?**

स्थानिक विकासकामे आणि कार्यकर्त्यांच्या भावना लक्षात घेऊन आपण शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षात प्रवेश करण्याचा निर्णय घेतल्याचे मोरे यांनी यावेळी सांगितले. महाविकास आघाडीच्या माध्यमातून मतदारसंघाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी आपण कटीबद्ध असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.या पक्षप्रवेशामुळे फुलंब्री तालुक्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले असून, आगामी काळात इतरही काही मोठे चेहरे पक्षांतर करण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## हर्सूल मनपा शाळेच्या आर्यन राजगुरू आणि आयेशा शेख यांच्या कवितांची 'कुमार साहित्य संमेलना'त निवड

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी/** जिल्हाधिकारी कार्यालय आणि जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने उद्या, २ फेब्रुवारी २०२६ रोजी जिल्ह्यातील सर्व शाळांमधील विद्यार्थ्यांचे भव्य 'कुमार साहित्य संमेलन' आयोजित करण्यात आले आहे. या संमेलनासाठी महानगरपालिका हर्सूल शाळेतील आर्यन राजपुरे (इयत्ता ९ वी) आणि आयेशा फिरोज शेख (इयत्ता ८ वी) या दोन उदयोन्मुख कवींच्या कवितांची निवड झाली आहे.

प्रशासकीय स्तरावर कौतुकाचा वर्षाव

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक जी. श्रीकांत यांनी दोन्ही विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक केले आहे. तसेच उपायुक्त अंकुश पांढरे, नियंत्रण अधिकारी गणेश दांडगे, शिक्षणाधिकारी भारत तीनगोटे, विस्तार अधिकारी रामनाथ थोरे आणि कार्यक्रम अधिकारी ज्ञानदेव सांगळे यांनीही विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

मार्गदर्शन आणि शाळेची परंपरा

या विद्यार्थ्यांना कविता लेखनासाठी शाळेचे शिक्षक संजय कुलकर्णी यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे. हर्सूल शाळेने केवळ साहित्यातच नव्हे, तर इतर कलागुणांमध्येही जिल्ह्याचे लक्ष वेधून घेतले आहे:

**नाट्य क्षेत्र:** जिल्हास्तरीय नाट्य स्पर्धेत शाळेने प्रथम क्रमांक पटकावला आहे.

**कला व भाषा:** पथनाट्य आणि चक्क फ्रेंच भाषेतही या शाळेच्या विद्यार्थ्यांनी प्राविण्य मिळवले आहे.

**नभोनाट्य:** शाळेच्या विद्यार्थ्यांच्या नभोनाटिकांचे राज्यातील सर्व आकाशवाणी केंद्रांवरून प्रसारण झाले आहे.

**साहित्यिक उपक्रम:** गेल्या पाच वर्षांपासून मराठी भाषा गौरव दिनानिमित्त शाळेत नियमितपणे 'विद्यार्थी साहित्य संमेलन' भरवले जाते, ज्याचा सकारात्मक परिणाम आज या निवडीतून दिसून येत आहे.



शिक्षकांचे सांघिक प्रयत्न

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी मुख्याध्यापक जगन्नाथ सपकाळ यांच्या नेतृत्वाखाली शिक्षकांची मोठी टीम कार्यरत आहे. यामध्ये लक्षण महालकर, अंकुश लाडके, संजय कुलकर्णी, संजय मोकळे, सुनील हिरेकर, रमेश वाडेकर, विशाल बाविस्कर यांच्यासह सहाने, मोटे, वैष्णव, बांबर्डे, मस्के, कन्नर, शिंदे, दांडगे, शेळके, चव्हाण, कीर्ती आणि शुभांगी मॅडम यांचा समावेश आहे.

हर्सूल शाळेतील विद्यार्थ्यांची ही प्रगती सरकारी शाळांच्या गुणवत्तेचा आरसा आहे. कविता आणि साहित्याच्या माध्यमातून विद्यार्थी आपली संवेदनशीलता व्यक्त करत आहेत, ही जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब आहे.

# जालना पालिकेचा 'ॲक्शन मोड': थकबाकीदारांनो सावधान!

## आता थेट मालमत्ता जप्त होणार; ५ पथके सज्ज

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/ प्रतिनिधी/** शहराच्या विकासाला खिळ घालणाऱ्या आणि वारंवार सूचना देऊनही मालमत्ता कर न भरणाऱ्या थकबाकीदारांविरुद्ध जालना महानगरपालिकेने आता युद्धाची घोषणा केली आहे.

कर भरा, अन्यथा जप्तीला सामोरे जा, असा कडक इशारा महानगरपालिका आयुक्त श्रीमती आशिमा मित्तल यांनी दिला आहे. वसुलीचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी आयुक्तांनी विशेष ५ पथकांची नियुक्ती केली असून, ही पथके आता शहरात धडक कारवाई करणार आहेत.

**आता विनंती नाही, थेट जप्ती!**

शनिवारी (३१ जानेवारी २०२६) महानगरपालिका कार्यालयात आयोजित आढावा बैठकीत आयुक्त मित्तल यांनी वसुलीच्या कामात ढिलाई देणाऱ्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे कान टोचले. शहरात रस्ते, नाली, पाणीपुरवठा आणि स्वच्छतेची कामे मार्गी लावण्यासाठी निधीची गरज असून, जोपर्यंत नागरिक कर भरत नाहीत, तोपर्यंत विकासकामे पूर्ण होणे अशक्य असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. त्यामुळे आता केवळ नोटिसा न देता, थेट 'मालमत्ता जप्ती' आणि 'सील' ठोकण्याची कारवाई सुरू करण्याचे आदेश त्यांनी दिले आहेत.

जप्तीसाठी ५ विशेष पथकांची स्थापना

वसुलीची मोहीम प्रभावी करण्यासाठी पालिकेने ५ स्वतंत्र पथके तैनात केली आहेत.

प्रत्येक पथकाकडे विशिष्ट भागाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. या पथकांमध्ये कर निरीक्षक आणि वसुली लिपिकांचा समावेश असून, मोठ्या थकबाकीदारांची यादी तयार करण्यात आली आहे.

**'अभय योजने'ची शेवटची संधी; ५०% सूट!**

कडक कारवाईचा बडगा उगारतानाच पालिकेने प्रामाणिक नागरिकांसाठी मदतीचा हातही दिला आहे.




'अभय योजने'अंतर्गत मालमत्ता करावरील शास्तीमध्ये (दंड) ५०% सवलत देण्याची मुदत आता २८ फेब्रुवारी २०२६ पर्यंत वाढवण्यात आली आहे.जप्तीची नामुष्की टाळायची असेल, तर नागरिकांनी ५०% सूट असलेल्या अभय योजनेचा लाभ घेऊन २८ फेब्रुवारीपूर्वी कर भरावा, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

**बैठकीत बड्या अधिकाऱ्यांची उपस्थिती**

या बैठकीला अतिरिक्त आयुक्त अर्जुन गिराम, सहायक आयुक्त श्रीमती अपर्णा जाधव, कर अधिकारी श्री. राहुल देशमुख यांच्यासह सर्व कर निरीक्षक आणि लिपिक उपस्थित होते. वसुलीत हयगय करणाऱ्या कर्मचाऱ्यांवरही कारवाई करण्याचे संकेत आयुक्तांनी दिले आहेत.

प्रशासनाचा इशारा: जालना शहरातील मोठ्या थकबाकीदारांवर या आठवड्यापासून प्रत्यक्ष जप्तीची कारवाई सुरू होईल. त्यामुळे नागरिकांनी त्वरित आपला कर भरून पालिकेला सहकार्य करावे, अन्यथा मालमत्ता सील झाल्यास होणाऱ्या परिणामांना मालमत्ता धारक स्वतः जबाबदार असतील.

# शेती आणि 'कृषी एआय'ला मोठी उभारी; महाराष्ट्राच्या 'डिजिटल मॉडेल' पान १ वरून..

जागतिक ब्रँडिंग: काजू आणि कोको या पिकांना जागतिक बाजारपेठ मिळवून देण्यासाठी ब्रँड उभारणी केली जाईल.

नगदी पिके: नारळ आणि चंदनाच्या उत्पादनासाठी विशेष प्रोत्साहन दिले जाणार आहे.

कापूस मिशन: कापसाची गुणवत्ता आणि उत्पादकता वाढवण्यासाठी नवीन योजना लागू होणार आहेत.

३. मत्स्यव्यवसाय आणि पशुपालनासाठी 'अमृत' काळ

ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देण्यासाठी मत्स्यव्यवसायाला मोठे बळ देण्यात आले आहे:

अमृत जलाशय: देशभरात ५०० नवीन जलाशयांची निर्मिती केली जाईल.

मत्स्य संपदा योजना: ६,००० कोटी रुपयांच्या गुंतवणुकीसह सूक्ष्म उद्योगांना चालना दिली जाईल.

४. शाश्वत शेती आणि खत सुधारणा

नैसर्गिक शेती: पुढील काळात १० दशलक्ष (१ कोटी) शेतकऱ्यांना नैसर्गिक शेतीकडे वळवण्याचे उद्दिष्ट आहे.

युरिया अनुदान सुधारणा: रासायनिक खतांवरील अवलंबित्व कमी करून 'पोषक तत्त्वांवर आधारित खत मॉडेल' स्वीकारले जाणार आहे.साठवणूक क्षमता: काढणीनंतर होणारे नुकसान टाळण्यासाठी स्थानिक पातळीवर विकेंद्रित गोदामांची साठवणूक क्षमता वाढवली जाईल.

५. महाराष्ट्रासाठी महत्त्वपूर्ण आर्थिक तरतुदी

राज्यातील कृषी पायाभूत सुविधांसाठी केंद्र व राज्याच्या समन्वयातून मोठी रक्कम खर्च केली जाणार आहे:

ॲग्री बिझनेस नेटवर्क: १६७ कोटी रुपये.

सौर ऊर्जिकीकरण (उपसा सिंचन): २०७ कोटी रुपये.


स्मार्ट प्रकल्प (ग्रामीण परिवर्तन): ६४६ कोटी रुपये.

कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांची प्रतिक्रिया: हा अर्थसंकल्प शेतकऱ्याला तंत्रज्ञानाने सज्ज करणारा आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र सरकार या केंद्रीय योजनांचा लाभ राज्यातील शेवटच्या शेतकऱ्यापर्यंत पोहोचवण्यासाठी कटिबद्ध आहे.

# 'विकसित भारताचे दमदार पाऊल'; रावसाहेब पाटील दानवे यांच्याकडून अर्थसंकल्पाचे स्वागत

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/ प्रतिनिधी/**केंद्र सरकारने नुकताच सादर केलेला अर्थसंकल्प हा केवळ आकड्यांचा खेळ नसून तो शेतकरी, कष्टकरी, युवक आणि महिलांच्या स्वप्नांना बळ देणारा आहे, अशा शब्दांत माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे यांनी या अर्थसंकल्पाचे स्वागत केले आहे. हा अर्थसंकल्प भारताला 'आत्मनिर्भर' बनवण्याच्या दिशेने टाकलेले एक महत्त्वपूर्ण पाऊल असल्याचे त्यांनी म्हटले आहे.



**ग्रामीण विकास आणि पायाभूत सुविधांवर भर**

दानवे यांनी नमूद केले की, या अर्थसंकल्पात ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासासाठी मोठी तरतूद करण्यात आली आहे. विशेषतःपायाभूत सुविधा: ग्रामीण रस्ते, स्वच्छ पिण्याचे पाणी आणि आरोग्य सुविधांच्या सक्षमीकरणासाठी निधी वाढवण्यात आला आहे.शिक्षण: ग्रामीण भागातील तरुणांना दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी विशेष पावले उचलली गेली आहेत.

रेल्वे खात्याचा अनुभव असलेल्या दानवे यांनी ७ नवीन हाय-स्पीड रेल्वे कॉरिडॉरच्या घोषणेचे विशेष कौतुक केले. त्यांच्या मते, या प्रकल्पांमुळे केवळ प्रवासाचा वेग वाढणार नाही, तर या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर तांत्रिक आणि बिगर-तांत्रिक रोजगाराच्या संधी निर्माण होतील. कनेक्टिव्हिटी वाढल्याने व्यापार आणि उद्योगालाही मोठी गती मिळेल.

युवक आणि उद्योजकतेवर लक्ष

हा अर्थसंकल्प तरुणांच्या आकांक्षेला न्याय देणारा आहे, असे सांगताना दानवे यांनी कौशल्य विकास आणि स्टार्टअप्सना मिळणाऱ्या प्रोत्साहनाचा उल्लेख केला. देशातील तरुणांनी केवळ नोकरी मागणारे न राहता 'नोकरी देणारे' बनावे, या उद्देशाने सरकारने उद्योगांसाठी अनुकूल धोरणे आखली असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

**शेतकऱ्यांचे सक्षमीकरण**

कृषी क्षेत्राबाबत बोलताना त्यांनी सांगितले की, शेतीपूरक उद्योगांना बळकटी देण्यासाठी करण्यात आलेल्या तरतुदींमुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्यास मदत होईल. आधुनिक तंत्रज्ञान आणि साठवणुकीच्या सुविधांमुळे शेती व्यवसाय अधिक फायदेशीर ठरेल. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली आणि अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सादर केलेला हा अर्थसंकल्प सर्वसमावेशक आहे. 'सबका साथ, सबका विकास' या मंत्राला अनुसरून समाजातील शेवटच्या घटकापर्यंत प्रगती पोहचवण्याचा विश्वास यातून मिळतो. - रावसाहेब पाटील दानवे एकंदरीत, या अर्थसंकल्पाने मध्यमवर्गीयांना दिलासा देतानाच विकासाचा वेग कायम राखला असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली असून, जालना जिल्ह्यासह संपूर्ण देशात या अर्थसंकल्पाचे स्वागत होत असल्याचे त्यांनी सांगितले.

# विक्रमशिला शाळेत घुमला छत्रपती शिवरायांच्या यशाचा मंत्र; चिमुकल्यांच्या प्रयोगांनी वेधले सर्वांचे लक्ष!

**आत्ताच एक्सप्रेस**

**अंबड (प्रतिनिधी)** छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावातच शिक्षणाचे खरे सार दडलेले आहे. 'शि' म्हणजे शिकायचं, 'वा' म्हणजे वाचायचं आणि 'जी' म्हणजे जगायचं. हाच मंत्र विद्यार्थ्यांनी आपल्या आयुष्यात अंगीकारला, तरच खऱ्या अर्थाने व्यक्तिमत्त्व विकास होईल, असे प्रेरक आवाहन ड. कृष्णा शर्मा यांनी केले. अंबड येथील शिवबा बहुउद्देशीय सेवाभावी संस्था संचलित विक्रमशिला प्राथमिक निवासी शाळेच्या नवीन अभ्यासक्रम उद्घाटन व वार्षिक बक्षीस वितरण सोहळ्याप्रसंगी ते बोलत होते. व्यंकटेश नगर येथील शाळेच्या प्रांगणात रविवारी हा सोहळा मोठ्या उत्साहात आणि दिमाखात पार पडला.

मान्यवरांची उपस्थिती आणि मार्गदर्शन

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी 'अंबडवार्ता'चे संपादक तथा तैलिक महासभेचे जिल्हाध्यक्ष बळीराम राऊत होते, तर कार्यक्रमाचे उद्घाटन रामकिसन सोळूंके यांच्या हस्ते करण्यात आले. प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलताना हंस फाउंडेशनचे अध्यक्ष माऊली दोबोले यांनी विद्यार्थ्यांना ध्येय निश्चितीचे महत्त्व समजावून सांगितले.व्यासपीठावर अनुसया हॉस्पिटलचे संचालक डॉ. महेश मुंढे, पंढरीपार्कचे सर्वेसर्वा मधुकर घुमरे, ज्येष्ठ पत्रकार राजेंद्र गायकवाड आणि रामकिसन सोळूंके यांची प्रमुख उपस्थिती होती.

विज्ञानाच्या प्रयोगांची मेजवानी

केवळ पुस्तकी ज्ञान न देता विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला आणि बुद्धिमत्तेला वाव देण्यासाठी शाळेच्या वतीने विज्ञान व गणित विषयांच्या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. चिमुकल्या विद्यार्थ्यांनी अत्यंत आत्मविश्वासाने सादर केलेले विविध प्रयोग उपस्थितांच्या कौतुकाचा विषय ठरले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमधील वैज्ञानिक दृष्टिकोन पाहून पालकांनी समाधान व्यक्त केले.

आदर्श शिक्षकांचा सत्कार

पुणे येथे नुकताच 'उत्कृष्ट शिक्षक' पुरस्काराने सन्मानित झालेले शाळेचे शिक्षक योगेश हरणे सर यांचा संस्थेच्या वतीने विशेष गौरव करण्यात आला. शाल, श्रीफळ आणि मानपत्र देऊन मान्यवरांनी त्यांच्या शैक्षणिक योगदानाचे कौतुक केले.

यशवंतांचा गौरव




शैक्षणिक वर्षात विविध स्पर्धा आणि परीक्षेत उल्लेखनीय यश मिळवणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते आकर्षक ट्रॉफी आणि प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. बक्षीस मिळाल्याचा आनंद विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर ओसंडून वाहत होता.

नियोजन आणि परिश्रम

या सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी शाळेचे संचालक संजय जाधव सर, योगेश हरणे सर, प्रमोद मस्के सर, शितल जाधव मॅडम आणि योगिता शिंदे मॅडम यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने पालक आणि नागरिक उपस्थित होते. बातमी लेखन: गणेश सपकाळ, जालना जिल्हा प्रतिनिधी.

# नयी सोच, नया भारत' संकल्पनेतून उमटला सामाजिक जाणीवेचा स्वर

**आत्ताच एक्सप्रेस**

**भोकरदन/ प्रतिनिधी/ सोपान प्र. सपकाळ**/भोकरदन येथील जनविकास शिक्षण संस्था संचलित श्री गणपती इंग्लिश हायस्कूलमध्ये वार्षिक स्नेहसंमेलन अत्यंत उत्साहात आणि जल्लोषात संपन्न झाले. यावर्षी नयी सोच, नया भारत ही विशेष संकल्पना केंद्रस्थानी ठेवून विद्यार्थ्यांनी विविध सामाजिक विषयांवर आधारित सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. केवळ मनोरंजनच नाही, तर प्रबोधनाचा संदेश देणाऱ्या या सोहळ्याने उपस्थितांची मने जिंकली.



सामाजिक विषयांवर विद्यार्थ्यांचे प्रभावी सादरीकरण

कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी आपल्या कलागुणांच्या माध्यमातून आधुनिक भारत आणि सामाजिक समस्यांचे दर्शन घडवले. यामध्ये प्रामुख्याने:

मंगलयान, चंद्रयान मोहिमांचे सादरीकरण आणि 'डिजिटल इंडिया' अंतर्गत तंत्रज्ञान सशक्तीकरणाचे महत्त्व पटवून दिले.'सेफ ऑनलाइन-स्ट्राँग भारत', रस्ते सुरक्षा, अंधश्रद्धा निर्मूलन आणि अंमली पदार्थ व व्यसनमुक्ती यांसारख्या ज्वलंत विषयांवर नाटिका सादर केल्या.

राष्ट्रहित व आरोग्य: शहीदांचा सन्मान, महिला सक्षमीकरण, लैंगिक समानता, सर्वांसाठी शिक्षण आणि योगाद्वारे आरोग्य संवर्धन या विषयांवर विद्यार्थ्यांनी प्रभावी संदेश दिले.

पर्यावरण व कृषी: स्वच्छ भारत अभियान, पर्यावरण संवर्धन आणि शेतकरी सक्षमीकरण या विषयांवर सादरीकरण करून सामाजिक जबाबदारीची जाणीव करून दिली.

मान्यवरांची उपस्थिती आणि कौतुक

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष तथा काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख होते. त्यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.याप्रसंगी केंद्रप्रमुख राजेंद्र सोनवणे, संस्थेचे संचालक अनिल देशपांडे, तुषार पाटील, इंद्रजीत देशमुख, प्रतीक देशमुख, नगर परिषद गटनेत्या सौ. गयाबाई रमेश जाधव आणि संतोष अन्नदाते यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाचे भरभरून कौतुक केले. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव, राष्ट्रीय भावना आणि सकारात्मक दृष्टिकोन विकसित होतो. विद्यार्थ्यांच्या सादरीकरणात राष्ट्रीय एकात्मतेचा भाव स्पष्टपणे दिसून आला, असे मत मान्यवरांनी व्यक्त केले.



# शास्त्री गल्लीतील 'भूमिपुत्रांचा' डंका; नवनिर्वाचित नगरसेवकांचा जंगी सत्कार

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/ प्रतिनिधी/** जालना महानगरपालिकेच्या नुकत्याच झालेल्या निवडणुकीत जुना जालना भागातील शास्त्री गल्ली परिसरातील रहिवासी असलेल्या अनेक भूमिपुत्रांनी घवघवीत यश संपादन केले आहे. आपल्याच गल्लीतील उमेदवार लोकप्रतिनिधी म्हणून निवडून आल्याचा आनंद साजरा करण्यासाठी, शास्त्री गल्लीतील नागरिकांच्या वतीने सर्व नवनिर्वाचित नगरसेवकांचा भव्य सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता.

हनुमान मंदिरात रंगला सोहळा

जुना जालना भागातील ऐतिहासिक दक्षिणमुखी हनुमान मंदिर परिसरात हा सोहळा पार पडला. सुरुवातीला मारुतीरायाचे दर्शन घेऊन आणि आशीर्वाद घेऊन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. एकाच गल्लीतील इतक्या मोठ्या संख्येने लोकप्रतिनिधी निवडून येणे, ही शास्त्री गल्लीसाठी अभिमानाची बाब असल्याचे मत यावेळी नागरिकांनी व्यक्त केले.

यांचा झाला सत्कार या सोहळ्यात परिसरातील नवनिर्वाचित नगरसेवकांचा शाल, श्रीफळ आणि पुष्पहार देऊन सन्मान करण्यात आला. सत्कारार्थींमध्ये प्रामुख्याने खालील मान्यवरांचा समावेश होता. अशोक पांगारकर (नवनिर्वाचित नगरसेवक),श्रीकांत पांगारकर (नवनिर्वाचित नगरसेवक),किशोर पांगारकर (नवनिर्वाचित नगरसेवक),विजय पांगारकर (नवनिर्वाचित नगरसेवक) यावेळी खुशालसिंह राणा ठाकुर, अमोल ठाकुर आणि पंकज हुंबे यांची देखील प्रमुख उपस्थिती होती.आपल्या लाडक्या नेत्यांचे स्वागत करण्यासाठी संपूर्ण शास्त्री गल्ली एकवटली होती. यावेळी भरत मानकस, राजेंद्र गोरे, संजय ठाकुर, देशमुख काका, कक्कड, बैजल, सुमेर ठाकुर यांच्यासह गल्लीतील ज्येष्ठ नागरिक, तरुण आणि महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. आमचे प्रतिनिधी आता महापालिकेत जाऊन भागाचे प्रश्न मांडतील आणि विकासाला गती देतील, असा विश्वास स्थानिक रहिवाशांनी व्यक्त केला.

नवनिर्वाचित नगरसेवकांनी देखील आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की, हा विजय आमचा नसून शास्त्री गल्लीतील प्रत्येक नागरिकाचा आहे. ज्या प्रेमाने आणि विश्वासाने आम्हाला निवडून दिले आहे, त्याला तडा जाऊ न देता आम्ही शहराच्या आणि प्रभागाच्या विकासासाठी कटिबद्ध राहू.

# 'विकसित भारताकडे दमदार पाऊल टाकणारा अर्थसंकल्प'; जालना भाजप जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांची प्रतिक्रिया

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/ प्रतिनिधी/** केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज (१ फेब्रुवारी २०२६) सादर केलेला अर्थसंकल्प हा देशाला प्रगतीच्या नव्या शिखरावर नेणारा आणि 'विकसित भारत' या संकल्पनेला बळकटी देणारा आहे, अशा शब्दांत भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी या अर्थसंकल्पाचे स्वागत केले आहे. हा अर्थसंकल्प उद्योग, पायाभूत सुविधा आणि सामान्य नागरिकांच्या आरोग्याचा विचार करणारा असल्याचे त्यांनी नमूद केले.

पायाभूत सुविधा आणि विकासावर भर

भास्कर आबा दानवे यांनी अर्थसंकल्पातील महत्त्वाच्या मुद्द्यांवर प्रकाश टाकताना सांगितले की, पायाभूत सुविधांच्या विकासासाठी केंद्र सरकारने १२ लाख कोटी रुपयांच्या गुंतवणुकीची तरतूद केली आहे. विशेषतः मुंबई-पुणे आणि पुणे-हैदराबाद हायस्पीड रेल कॉरिडॉरमुळे महाराष्ट्राच्या आणि देशाच्या जीडीपीमध्ये मोठी वाढ होईल. तसेच, आगामी ५ वर्षांत प्रत्येक 'ग्रोथ हब'साठी ५००० कोटी रुपये मिळणार असून, याचा थेट



फायदा महाराष्ट्रातील प्रमुख शहरांच्या विकासासाठी होणार आहे.

कृषी आणि महिला सक्षमीकरण

शेती, पशुपालन, मत्स्यव्यवसाय आणि सिंचनासाठी करण्यात आलेल्या भरीव तरतुदींमुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला उभारी मिळेल. 'लखपती दीदी' योजनेच्या यशानंतर आता महिलांसाठी स्वतंत्र मॉल्स आणि रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध करून देणे, हा महिला सक्षमीकरणाच्या दिशेने एक मोठा निर्णय आहे. प्रत्येक जिल्ह्यात उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींसाठी वसतीगृहांची सुविधा उपलब्ध करून देण्याचा निर्णय अत्यंत स्वागतार्ह असल्याचे दानवे यांनी म्हटले.

आरोग्य क्षेत्रात मोठी सवलत: औषधे होणार स्वस्त

सामान्य नागरिकांसाठी सर्वात मोठा दिलासा म्हणजे आरोग्य क्षेत्रातील घोषणा. यावर बोलताना दानवे म्हणाले:

कॅन्सर (कर्करोग) आणि मधुमेहाच्या (ऊळरलशींशी) जीवनरक्षक औषधांवरील कर कमी करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. यामुळे ही औषधे स्वस्त होऊन सामान्य रुग्णांना मोठा आधार मिळेल. तसेच जिल्हा रुग्णालयांमध्ये 'आपात चिकित्सा' (एशीसशपलू उरीश) व्यवस्था उभी राहिल्याने आरोग्य सेवा अधिक सक्षम होईल.

उद्योग आणि आत्मनिर्भरता

देशाला आत्मनिर्भर बनवण्यासाठी सेमीकंडक्टर क्षेत्रासाठी केलेली मोठी तरतूद, दुर्मिळ खनिज उत्खनन, औषधनिर्मिती (इळेहिरीर) आणि केमिकल पार्क निर्मितीवर दिलेला भर उद्योजकतेला नवी चालना देईल.

नियोजनबद्ध शहरीकरण आणि गुंतवणूक वाढवून रोजगार निर्मितीसाठी खंबीर पावले या अर्थसंकल्पातून उचलण्यात आली आहेत, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट ॲण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247

The Printer, Owner Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813